<u>महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पदवी/पदविका समकक्ष ठरविणेबाबत...</u>

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २-८-२००३

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-१०००/प्र.क्र.१४३/३९, दिनांक १०/७/२०००

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२००१/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक ७/८/२००१

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक २०/७/२००२

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक ४/१०/२००२

<u>प्रस्तावना :</u> दिनांक २०-७-२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ (VII) मधील तरतूदी प्रमाणे अधिकारी/कर्मचाऱ्यांनी D.O.E.A.C.C. अथवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत पदवी/पदविका उत्तीर्ण करुन प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास त्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या MSCIT किंवा CCC परीक्षा पुन्हा उत्तीर्ण करणे आवश्यक नाही. तथापि, सदर शासन निर्णयात राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या कोणत्या पदवी/पदविका MSCIT या शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष/उच्च आहेत, याबाबतचा उल्लेख नाही. याबाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :--

<u>शासन निर्णय :--</u>

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या खाली नमूद केलेल्या पदवी/पदविका/पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना MSCIT किंवा CCC परीक्षा पुन्हा उतीर्ण करणे आवश्यक राहणार नाही.

अ.क्र.	म.रा.तंत्रशिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाचे नाव	स्तर
१	संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology)	पदविका
२	संगणक अभियांत्रिकी (Computer Engg.)	पदविका
३	माहिती तंत्रज्ञान (Information Technology)	पदविका
४	संगणक उपयोजन (Computer Application)	पदविकोत्तर पदविका
५	संगणक उपयोजन पध्दती व पृथक्करण (ADCSSAA)	पदव्युत्तर/प्रगत पदविका
६	माहिती तंत्रज्ञान (Information Technology)	पदव्युत्तर पदविका

रोटा/एच–694(5000–8–03)1

(कृ.मा.प.

हे आदेश शासकीय, निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, महानगरपालिका नगरपालिका,महामंडळे,मंडळे,स्थानिक स्वराज्य संस्था, शासनाच्या अधिनस्त आणि शासनास संलग्न संस्था इत्यादींना लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

नितीन गद्रे

(नितीन गद्रे)
सह सचिव तथा संचालक (मा.तं.)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
शासनाचे मुख्य सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,(विधान परिषद/विधानसभा) मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागूपर,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
पोलीस महासंचालक, मुंबई,
सर्व पोलीस उपमहासंचालक,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत, ३ महानगरपालिका मार्ग, मुंबई-४०० ००१
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई/लेशाकोष भवन, वांद्रे (पू.),मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती)

 ---------- x ----------